फिर्याद नि.क्र.०१  (१) संक्षिप्त खटला क्रमांक ३६/२०१८
श्रीमती सविता ओव्हाळ वि. गंगाराम मोहिते + ८

## <u>फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २००</u>
## <u>नुसार फिर्यादीची शपथेवर तपासणी</u>

मी शपथपुर्वक निवेदन करतो की :
माझे नाव श्रीमती सविता ओव्हाळ. पतीचे नाव : काशिनाथ ओव्हाळ.
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती.
राहणार : तिसे, तालुका : रोहा,
जिल्हा रायगड.

<u>फिर्यादीतर्फे विधीज्ञ श्री. आर. बी. सावंत हजर</u> :-

**०१.** मी गंगाराम देवू मोहिते, प्रफुल्ल तुकाराम कांबळे, राकेश रविंद्र कांबळे, संगिता जनार्दन कांबळे, रोहित रविंद्र कांबळे, राजेश वसंत शिंदे, विकेश जनार्दन कांबळे, सचिन हरिभाऊ जाधव आणि ऋषीकेश रविंद्र कांबळे यांना ओळखते. मी तसेच ते सर्वजण मौजे तिसे, बौद्धवाडी येथे राहतात. सदरची घटना दिनांक २७.१२.२०१७ रोजी घडली. मी व पायल उदय शिंदे असे हरिभाऊ चिंदू कांबळे यांच्या घरी बसलो होतो. आम्हाला सुनंदा गायकवाडच्या घराकडे भांडणाचा आवाज आला. मी आणि पायल शिंदे आवाज ऐकून हरिभाऊ चिंदू कांबळेच्या घराकडे गेलो.

**०२.** मला व पायल शिंदेला हरिभाऊ कांबळेच्या घराच्या कोप-यावर गंगाराम देवू मोहिते आणि प्रफुल्ल तुकाराम कांबळे यांनी अडवले. मला गंगाराम मोहिते म्हणाला की, ''सदस्य तुला कसला माज आला आहे, तुझा माज उतरवून टाकतो''. मला राकेश कांबळे म्हणाला की, ''सदस्य पुढे आलीस तर तुझी तंगडी तोडून हातात देईन''.

**०३**. संगिता कांबळे व रोहित कांबळे हे अंगावर धावून आले आणि मला शिवीगाळ केली की, ''रांड, भोसडे तुला कसला माज आहे, आयझवाडे, आईची गांड.'' राजेश शिंदे, राकेश कांबळे आणि विकेश कांबळे यांनी शिवीगाळ केली की, ''या बायकांना खाज आली आहे, यांची खाज मोडायला पाहिजे.'' राजेश शिंदे म्हणाला की, ''सुनंदा गायकवाडला जसे मारले आहे तसे या दोघींना मारायला पाहिजे''. सचिन जाधव म्हणाला की, ''या रांडांनापण धरा''. प्रफुल्ल कांबळे मला म्हणाला की, ''जास्त करायला लागली तर तुला आणि तुझ्या मुलाला बघू''. ऋषीकेश कांबळे म्हणाला की, ''या येडयालवडयाचींना धरा''. मी ऋषीकेश कांबळेला म्हणाले की, तु कोणाला म्हणालास? मला तो म्हणाला की, मी पायल शिंदेला बोलतोय. मी त्यानंतर घरी गेले. मी आणि माझा मुलगा सुनिल काशिनाथ ओव्हाळ त्यानंतर पोलीस ठाण्यात गेलो. पोलीसांनी आमची केस घेतली नाही. मी पोलीस ठाण्यात आठ दिवस जात होते. पोलीसांनी आमची केस घेतली नाही म्हणून मी प्रस्तुत फिर्याद दाखल केली आहे.

मला माझी तपासणी विधीज्ञांच्या हजेरीत वाचून दाखवली, बरोबर लिहले आहे, म्हणून मी खाली सही करते.

---**स्वाक्षरी**---

फिर्यादीची सही व तारीख

माझे समक्ष

---**स्वाक्षरी**---

(सुभाष ल. फुले)
(एम एच आर जी ०००९ - २१२५)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, रोहा.
दिनांक ०५.०५.२०१८.